# कंत्राटी पदभरती जाहीरात

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग, नवी दिल्ली अंतर्गत व इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जळगाव करीता खालिल रिक्त असलेल्या पदांकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रीत मानधन / व्हिजिटींग अवर तत्वावर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Post | No. of Post | Education Qualification |
|---|---|---|---|
| 1 | **Sr. Physiotherapist** | 1 | Bachelor in Physiotherapist (BPT) |
| 2 | **Rehabilitation Psychologist** | 1 | i) M.Phil. Rehabilitation Psychology<br>ii) Post Graduate Diploma in Rehabilitation Psychology (PGDRP |
| 3 | **Sr. Prosthetist / Orthotist** Technician | 1 | Diploma in P&O with 3 Years Experience |
| 4 | **Jr. Speech Therapist** | 1 | Diploma in Hearing Language and Speech (DHLS) |
| 5 | **Accountant Cum Clerk cum Storekeeper** | 1 | B.Com / SAS with 2 Years Experience |
| 6 | **Attendance cum Peon cum Messenger** | 1 | VIII Pass |

अटी व शर्ती

1) उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून सदर पदांचा कालावधी 11 महिन्यासाठी राहील.
2) देय मानधन हे एकत्रीत असुन त्या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.
3) अर्जामध्ये अर्जदाराने नमुद केलेल्या कागदपत्राच्या छायाकिंत व स्वाक्षाकित प्रती जोडणे आवश्यक आहे. कागदपत्रे अपुर्ण असल्यास अर्ज अपात्र ठरवण्यात येईल. याबाबतची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
4) उपरोक्त जाहिरातीतील नमुद पदे कमी / अधिक किंवा रद्द करण्याचे तसेच देय मानधनाबाबतचे सर्वस्वी अधिकार हे जिल्हा व्यवस्थापन समिती तसेच इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या व्यवस्थापन मंडळाने राखुन ठेवले आहेत.
5) उपरोक्त पदे कंत्राटी स्वरुपाचे असून सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच पदासाठी शासनाचे सेवा, नियम लागु नाही. तसेच शासनामार्फत तसेच संस्थेमार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
6) प्राप्त अर्जापैकी दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव विचारात घेण्यात येईल.
7) उमेदवाराची निवड ही गुणाकंन पध्दतीने अनुभवानुसार करण्यात येणार आहे. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबाब तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल.
8) अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
9) अर्ज दाखल करतेवेळी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत असेल.

10) निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी किंवा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.
11) प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवांराची यादी करुन शैक्षणिक अर्हता व अनुभव यानुसार प्राधान्यक्रम लावण्यात येईल. एका पदासाठी 3 उमेदवार या पध्दतीने गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.
12) गुणाकंन यादीनुसार उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.
13) संबधीत पदासाठी सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानूसार उमदेवार निवडीचे अधिकार हे जिल्हा व्यवस्थापन समितीस राहील.
14) सदर पद भरतीबाबत अटी शर्ती मध्ये बदल करणे किंवा भरती रद्द करणे इ. प्रकारचे सर्व अधिकार जिल्हा व्यवस्थापन समिती, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकाराचा दावा करता येणार नाही.
15) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायाकिंत व साक्षांकित प्रतीसह **'प्रशासकीय अधिकारी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, रेडक्रॉस भवन, सिव्हील हॉस्पीटलच्या बाजुला, नवीन बी. जे. मार्केट जवळ, जळगाव'** या नावे प्रत्यक्ष सादर करावा. पोष्टाने किंवा इतर मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
16) उमेदवारांनी आपले अर्ज वरील पत्त्यावर सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत दिनांक 30/06/2024 पर्यत सादर करावे.

**नोडल अधिकारी,**
**जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जळगाव.**

**चेअरमन**
**इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव.**

.